**<u>विकास योजना - नागपूर (सुधारित)</u>**
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१कक) (ग) अन्वये अधिसूचना निर्गमित करणेबाबत..
मौजे सिताबर्डी खसरा क्र. ३०२ खालील क्षेत्र नागपूर मेट्रोसाठी वाणिज्य वापर, मेट्रो रेल्वे स्टेशन व अनुषंगीक वापरासाठी दर्शविण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**शासन निर्णय** क्र.टिपीएस-२४१५/१८२/प्र.क्र.९८/२०१५/नवि-९
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक- १४ मार्च, २०१८.

**शासन निर्णय**:- सोबतची अधिसूचना (मराठी / इंग्रजी) महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,*

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32

(रा. शा. चौहान)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**
१) संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
३) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
४) व्यवस्थापकीय संचालक, नागपूर मेट्रो रेल कार्पोरेशन लि. नागपूर
५) उप सचिव (नवि), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) जिल्हाधिकारी, नागपूर.
७) विभागीय सह संचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर.
८) सहायक संचालक नगररचना, नागपूर शाखा, नागपूर.
(त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत अधिसूचनेच्या अनुषंगाने शासनाने अधिप्रमाणित करावयाच्या विकास योजना भाग नकाशाच्या पाच प्रतीत शासनास विहीत मार्गाने सत्वर सादर कराव्यात.)
९) व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय, नागपूर.
(त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात नागपूर विभाग, भाग-एक पुरवणीमध्ये प्रसिध्द करण्यात येऊन त्याच्या प्रत्येकी ०५ प्रती या विभागास व संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे पाठवाव्यात.)
१०) कक्ष अधिकारी, (नवि-२९) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
(त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना विभागाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावी.)
११) निवडनस्ती (कार्यासन नवि-९)

C:\2014-2017\Kalam\Kalam 37(1kk)\Metro C.R.98-सूचना.docx

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक - १४ मार्च, २०१८**

# अधिसूचना

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६*

क्र.टिपीएस-२४१५/१८२/प्र.क्र.९८/२०१५/नवि-९: ज्याअर्थी, नागपूर शहराची दुसरी सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) चे कलम ३१ चे उप कलम (१) नुसार अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४९६/२६४३/प्र.क्र.३००(अ)/१९९७/नवि-९, दि. ०७ जानेवारी, २००० अन्वये मंजूर केली असून ती दि. ०१ मार्च, २००० पासून अंमलात आली आहे (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, नागपूर महानगरपालिका क्षेत्रात, नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पास (यापुढे "उक्त मेट्रो" असे संबोधले आहे) राज्य शासनाने निर्णय क्र. नासुप्र-३३१३/प्र.क्र.४१/नवि-७, दि. ३०/१/२०१४ अन्वये तर केंद्र शासनाने पत्र क्र. शासनाने पत्र क्र. के-१४०११/२४/२०१३-एमआरटीएस-४, दि. ११/२/२०१४ नुसार तत्वत: मान्यता दिलेली असून पत्र क्र. के-१४०११/(एन-१)/२०१४/एमआरटीएस-३, दि. २१/८/२०१४ अन्वये अंतिम मान्यता दिली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत, मौजे सिताबर्डी येथील खसरा क्र. ३०२, सिटी सर्व्हे क्र. १८४८, एकुण क्षेत्र ५.३५ हेक्टर ही शासकिय जागा सार्वजनिक व निमसार्वजनिक विभाग व रस्ता मध्ये समाविष्ट आहे. (यापुढे "उक्त जागा" असे संबोधले आहे) ;

आणि ज्या अर्थी, व्यवस्थापकीय संचालक, नागपूर मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यांनी दि. ३०/१/२०१६ रोजीच्या पत्रान्वये नागपूर मेट्रो प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने मौजे सिताबर्डी खसरा क्र. ३०२, सिटी सर्व्हे क्र. १८४८, मधील १८७२.२८ चौ.मी. सार्वजनिक / निमसार्वजनिक वापराचे व १६६२.३६८ चौ.मी. रस्त्यावरील (elevated) असे एकुण ३५३४.६५६ चौ.मी. क्षेत्र वाणिज्य वापराकरीता तथा मेट्रो रेल प्रकल्पांतर्गत स्टेशन व अनुषंगीक या वापराकरीता समाविष्ट करण्याची शासनास विनंती केलेली आहे (या पुढे "उक्त प्रस्ताव" असे संबांधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने उक्त प्रस्तावांतर्गत जागा "वाणिज्य" तथा मेट्रो रेल प्रकल्पातर्गत स्टेशन व अनुषंगीक या वापर विभागात (यापुढे "उक्त फेरबदल" असे संबोधले आहे) समाविष्ठ करणे आवश्यक झाले आहे, असे राज्य शासनाचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) (क) अन्वये प्रदत्त असलेल्या अधिकारानुसार शासनाने प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रस्तुतची सूचना दि. २४/०७/२०१७ रोजीच्या शासन राजपत्रात प्रसिध्द करुन तसेच वृत्तपत्रात प्रस्तावित फेरबदलासंदर्भात प्राप्त होणाऱ्या सूचना / हरकतीवर सुनावणी देण्यासाठी सह संचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर यांची उक्त अधिनियमाचे कलम १६२ (१) अन्वये अधिकारी म्हणून नियुक्ती केली ;

आणि ज्याअर्थी नियुक्त अधिकारी यांनी दि. ११/१०/२०१७ रोजी त्यांचा अहवाल शासनास

URBAN DEVELOPMENT DEPTT. MUMBAI-32

सादर केलेला आहे. तद्नंतर आवश्यक त्या चौकशी अंती व संचालक नगररचना महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर प्रस्तावित फेरबदलास मान्यता देण्याचे शासनाचे मत झाले आहे ;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उपकलम (१कक) (ग) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकारांचा वापर करुन विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदलास खालील प्रमाणे मान्यता देत आहे ;

**फेरबदल**

| अ. क्र. | जागेचे वर्णन | उक्त विकास योजनेतील प्रस्ताव | मंजूर फेरबदल |
|---|---|---|---|
| १. | मौजा सिताबर्डी खसरा क्र. ३०२, सिटी सर्व्हे क्र. १८४८<br>१) क्षेत्र १८७२.२८ चौ.मी.<br>२) क्षेत्र १६६२.३६८ चौ.मी. | सार्वजनिक / निमसार्वजनिक<br>रस्त्यावरील क्षेत्र | वाणिज्य<br>रस्त्यावरील क्षेत्रात (elevated) मेट्रो रेल प्रकल्पाअंतर्गत स्टेशन व अनुषंगिक वापर |

उक्त फेरबदल दर्शविणारी प्रस्तूत अधिसूचना / भाग नकाशा जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत एक महिना कालावधीसाठी उपलब्ध राहिल.

१. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
२. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
३. व्यवस्थापकीय संचालक, नागपूर मेट्रो रेल कार्पोरेशन लि. नागपूर.
४. सह संचालक नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर.
५. सहायक संचालक नगर रचना, नागपूर शाखा, नागपूर.

सदर अधिसूचना विभागाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध राहील.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,*

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

(राहुल)

(रा. शा. चौहान)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

C:\2014-2017\Kalam\Kalam 37(1kk)\Metro C.R.98-सूचना.docx

# GOVERNMENT OF MAHARASHTRA
**Urban Development Department**
**Mantralaya, Mumbai 400 032.**
**Date- 14th March, 2018.**

## NOTIFICATION

***The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966***

**No.TPS-2415/182/CR-98/2015/UD-9:-** Whereas, the Government has sanctioned the Second Revised Development Plan of Nagpur Municipal Corporation (hereinafter referred to as the said Development Plan) *vide* Urban Development Departments Notification No.TPS-2496/ 2643/CR-300(A)/97/UD-9, dated the 7th January, 2000 under sub section *(1)* of section 31 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as the said Act) which has come into force with effect from the 1st March, 2000 ;

And whereas, the State Government has given its approval to the Nagpur Metro Rail Project (hereinafter referred to as "the said Metro") vide the Government Resolution No. NIT-3313/CR-64/UD-7, dated the 30th January, 2014 and the Central Government also has conveyed its in-principle approval vide its letter No. K-1401/24/2013-MRTS-IV, dated the 11th February, 2014 and accorded its final approval vide its letter No. K-14011/(N-1)/2014-MRTS-III, dated the 21st August, 2014 ;

And whereas, the Government land bearing Khasara 302, C.T.S. No. 1848 admeasuring about 5.35 Ha. of Mouze Sitabardi is shown as Public / Semi-Public Zone and Road in said Development Plan (hereinafter referred to as the "said lands") ;

And whereas, the Nagpur Metro Rail Corporation Ltd. Nagpur has requested to the Government to include the land bearing Khasara No. 302, CTS No. 1848, of Mouje Sitabardi (admeasuring 1872.28 Sq. Mt.) which is in Public / Semi – Public Zone as per Development Plan and the land over the Road admeasuring 1662.328 sq. Mt. thus total land admeasuring 3534.656 Sq. Mt. in to Commercial zone for implementation of said Metro Project and Metro Rail Station and allied uses (hereinafter referred to as the "said Proposal");

And whereas, the State Government is of the opinion that, in the public interest, it is necessary to take recourse of Section 37 (1AA) (a) of the said Act. to make modification in the sanction Development Plan regarding the said proposal (hereinafter referred to as the said Modification) ;

And whereas, in exercise of the powers vested under Section 37 (1AA) (a) of the said Act, the Government has published the Notice for inviting Suggestion / Objection from the general public in respect to the said Modification, in the Official Gazette Dated 24/07/2017 as well as the news paper and for hearing suggestions / objections received respect of the said modification, appointed the Joint Director of Town Planning, Nagpur Division, Nagpur, as the officer under section 162(1) of the said Act. ;

And whereas, the appointed Officer has submitted his report to the Government on 11/10/2017, and after making necessary inquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government find it expedient that the said modification sanctioned.

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

C:\2014-2017\Kalam\Kalam 37(1kk)\Metro C.R.98-सूचना.docx

Now therefore, in exercise of the powers conferred on it under sub section (1AA)(C) of section 37 of the said Act. Government hereby, sanctions the said modification accordingly and for that purpose amends the said Development Plan as follows

## "Modification"

| Sr. No. | Description of land | Proposal in the said Development Plan | Sanction Modification |
|---|---|---|---|
| 1 | The Land bearing Khasara No. 302, CTS No. 1848 Mouje Sitabardi | | |
| | 1) The land admeasuring 1872.28 Sq. Mt. | Public / Semi-Public | Commercial |
| | 2) The land admeasuring 1662.368 Sq. Mt. | Area over the road | Metro Rail project station & allied activity to be constructed over the road. |

This Plan showing the said Modification along with this Notification, shall be kept open for inspection of the general public, at the following offices on all the working days for the period of one month.

1) The Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur.
2) The Nagpur Improvement Trust, Nagpur.
3) The Managing Director, Nagpur Metro Rail Corporation Ltd. Nagpur.
4) The Joint Director of Town Planning, Nagpur Division, Nagpur.
5) The Assistant Director of Town Planning, Nagpur Branch, Nagpur.

This Notice shall also be available on the State Government web site – www.maharashtra.gov.in

***By order and in the name of the Governor of Maharashtra.***

URBAN DEVELOPMENT DEPTT. ★ MANTRALAYA, MUMBAI-32 ★ सत्यमेव जयते

( R. S. Chouhan )
**Section Officer to Government**

C:\2014-2017\Kalam\Kalam 37(1kk)\Metro C.R.98-सूचना.docx